कोव्हिड-१९ संबंधित कर्तव्य बजावत असताना कोरोना विषाणूचा संसर्ग होऊन मृत्यू पावलेल्या कर्मचाऱ्यांच्या कुटूंबियांना विमा कवच/सानुग्रह सहाय्य मंजूर करण्याबाबत.
कै.(श्रीम) इंद्रकला ईश्वर साठवणे, मुख्याध्यापक

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण विभाग
शासन ज्ञापन क्रमांक : सहाय्य-२०२२/प्र.क्र.८८/E-१३६७५३३/ टीएनटी-६
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई -४०० ०३२
दिनांक : १५ जुलै २०२६

<u>संदर्भ</u> :-

१. वित्त विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण २०२०/प्र.क्र.४/व्यय-९,दिनांक २९.०५.२०२०, दिनांक. १४.१०.२०२० व दिनांक १४.०५.२०२१
२. शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचे क्रमांक: सहाय्य-२०२०/प्र.क्र.८१/टीएनटी-६,दिनांक ०७.१२.२०२० व दिनांक १६.०३.२०२१ चे पत्र.
३. वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र,कोदामेंढी ता.मौदा जि. नागपूर यांचे प्रमाणपत्र क्र. प्राआकेंका/को.ल./१०६/२०२१, दि.११/०६/२०२१
४. शिक्षण संचालक (प्राथमिक) यांचे पत्र क्र.प्राशिसं/संकीर्ण/को.वि./५१६/१२६४/२०२२, दिनांक २८/०३/२०२२
५. तालुका दंडाधिकारी तथा इन्सिडंट कमांडर,मौदा यांचे पत्र दि.०८/०६/२०२१
६. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद,नागपुर यांचे पत्र क्र.जिपना/शिविप्रा/स्था-७ अ/ विमाकवच/८१४२/२०२५ दि.३०/०९/२०२५
७. मा. राज्यमंत्री (वित्त व नियोजन, कृषि, मदत व पुनर्वसन, विधि व न्याय, कामगार) महोदय यांच्या अध्यक्षतेखाली दि. १७ सप्टेंबर, २०२५ दि.०४ फेब्रुवारी २०२६ व दि.१० फेब्रुवारी २०२६ रोजी झालेल्या बैठका.
८. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद,नागपूर यांचे पत्र क्र.जिपना/शिविप्रा/स्था-७ अ/ विमाकवच/११८४/२०२६ दि.१३/०२/२०२६

<u>ज्ञापन</u> :-

कै.(श्रीम) इंद्रकला ईश्वर साठवणे, मुख्याध्यापक, समर्थ रामदास प्राथमिक विद्यामंदिर, ता. मौदा, जि. नागपूर यांचा कोव्हिड-१९ संबंधित कर्तव्य बजावताना कोव्हिड-१९ मुळे दिनांक २१/०३/२०२१ रोजी मृत्यू झालेला आहे.

२. कै. (श्रीम.) साठवणे यांच्या वारसास वित्त विभागाच्या संदर्भ क्र. (१) येथील दिनांक २९.०५.२०२० च्या शासन निर्णयानुसार रु.५०.०० लक्ष रकमेचे सानुग्रह सहाय्य देण्याबाबतचा प्रस्ताव शिक्षण संचालक (प्राथमिक), पुणे यांनी संदर्भ क्र. (४) येथील पत्रान्वये सादर केला आहे.

३. कै. (श्रीम.) साठवणे यांचे पती श्री. ईश्वर बकाराम साठवणे यांनी त्यांच्या पत्नीला देय असणारी कोव्हिड-१९ विमा कवच मधील रक्कम मिळण्याबाबत दिनांक १७/०५/२०२१ रोजीच्या निवेदनाद्वारे विनंती केली आहे. सबब, कै. (श्रीम.) साठवणे यांच्या वारसास वित्त विभागाच्या दि.२९/०५/२०२० च्या शासन निर्णयान्वये रु. ५० लक्ष रकमेचे सर्वकष वैयक्तिक अपघात कवच मिळावे असा प्रस्ताव शिक्षण संचालक (प्राथमिक), शिक्षण संचालनालय, पुणे यांनी सादर केला आहे.

४. कै.(श्रीम) इंद्रकला ईश्वर साठवणे, मुख्याध्यापक, समर्थ रामदास प्राथमिक विद्यामंदिर, ता. मौदा, जि. नागपूर येथे दिनांक ०१/०६/१९९३ पासून कार्यरत होत्या.

५. कै. (श्रीम.) साठवणे ह्या माहे एप्रिल २०२० पासून ते दिनांक १७/०३/२०२१ पर्यंत ग्राम अरोली येथे कोव्हिड-१९ कर्तव्यावर कार्यरत असल्याबाबत तालुका आरोग्य अधिकारी,मौदा यांनी दि.१४/०६/२०२१ रोजीच्या प्रमाणपत्राद्वारे प्रमाणित केले आहे. सदर आदेशाच्या अनुषंगाने कै.(श्रीम.) साठवणे ह्या १४ दिवसाच्या काळात कोव्हिड-१९ कर्तव्यावर कार्यरत असल्याबाबत तालुका दंडाधिकारी तथा इन्सिडंट कमांडर,मौदा यांनी प्रमाणपत्र सादर केले आहे.

६. कै. (श्रीम.) साठवणे यांची दि.१७/०३/२०२१ रोजी केलेली कोव्हिड-१९ चाचणी पॉझिटिव्ह आली असल्याचे दिसून येते.

७. कै. (श्रीम.) साठवणे यांचा दिनांक २१/०३/२०२१ रोजी मृत्यु झाल्याबाबतचे मृत्यु प्रमाणपत्र उपनिबंधक (जन्म व मृत्यु), नगरपरिषद, कामठी यांचे प्रमाणपत्र सादर करण्यात आले आहे.

८. कै. (श्रीम.) साठवणे यांचेवर दिनांक १९/०३/२०२१ पासून ते दिनांक २१/०३/२०२१ या कालावधीत चौधरी हॉस्पिटल,कामठी येथे कोव्हिड-१९ उपचार करण्यात आले. दिनांक २१/०३/२०२१ रोजी कोव्हिड-१९ आजाराने मृत्यु झाल्याचे वैद्यकीय प्रमाणपत्र फॉर्म क्र. ४ द्वारे वैद्यकीय अधिकारी, चौधरी हॉस्पिटल,कामठी, यांनी प्रमाणित केल्याची झेरॉक्स प्रत आहे. सदर प्रमाणपत्राची क्षेत्रीय कार्यालयाने मूळ प्रत प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे.

९. मा. दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर,रामटेक यांनी कै. (श्रीम.) साठवणे यांचे कायदेशिर वारस म्हणून (१) ईश्वर बकाराम साठवणे (२) लोकेश ईश्वर साठवणे (३) शिल्पा ईश्वर साठवणे यांना घोषित केले आहे.

१०. कै.(श्रीम) इंद्रकला ईश्वर साठवणे, मुख्याध्यापक, समर्थ रामदास प्राथमिक विद्यामंदिर, ता. मौदा, जि. नागपूर यांना २२०२ ०२०८-३६ सहायक अनुदान (वेतन) या लेखशिर्षातून मासिक वेतन अदा करण्यात येत असल्याचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नागपूर यांनी प्रमाणित केले आहे.

११. तालुका दंडाधिकारी तथा इन्सिडंट कमांडर,मौदा व वैद्यकीय अधिकारी, चौधरी हॉस्पिटल,कामठी यांनी प्रमाणित केल्यानुसार एकत्रित रु.५० लक्ष (रुपये पन्नास लक्ष फक्त) इतक्या रकमेचे सर्वकष वैयक्तिक अपघात विमा कवच /सानुग्रह सहाय्य प्रदान करण्यास वित्त विभागाच्या

दिनांक २९/०५/२०२० च्या शासन निर्णयानुसार याद्वारे वरील ८ मधील अटीच्या अधीन राहून मंजूरी देण्यात येत आहे.

१२. प्रस्तुत प्रस्तावास आणि प्रस्तावावरील खर्चास वित्त विभागाच्या अभिप्रायानुसार अनौपचारिक संदर्भ क्र.४३६/व्यय-५ दि.३०/०६/२०२६ अन्वये दिलेल्या मंजूरीनुसार खाली नमूद लेखाशीर्षाखालील मंजूर अनुदानातून भागविण्यात येईल.

लेखाशीर्ष २२०२ ०२०८- (०३) (०२) इतर स्थानिक संस्थाना अनुदाने (अनिवार्य) ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर)

१३. सदर निधी वितरित करण्यासाठी आयुक्त (शिक्षण), पुणे यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. सदर निधी संबंधितांना प्रत्यक्ष प्रदान झाल्याबाबतची माहिती प्रमाणीकरणासह सादर करावी.

१४. सदर शासन ज्ञापन, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून, त्याचा संकेतांक २०२६०७१५१५३१५९६६४९ असा आहे. हा शासन आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VISHAL
RATANSINGH
PARMAR

Digitally signed by VISHAL RATANSINGH PARMAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SESD,
2.5.4.20=2CC6E1255B3FF149CD956DACB210C9ECB0A2EEB3
C3240813C9A70FD59F1D0491, postalCode=400032,
st=Maharashtra,
serialNumber=CD03E2FF5EF4A65D9AB0C8C899382698AC34
CBEEA041BF06D832884BBCA06F50, cn=VISHAL
RATANSINGH PARMAR
Date: 2026.07.15 15:32:59 +05'30'

(वि.र.परमार)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत, माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता :-

१. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
२. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
३. विभागीय शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर
४. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद नागपूर, यांनी उपरोक्त परिच्छेद ८ प्रमाणे कार्यवाही करावी.
५. जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर
६. अधिक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक, (प्राथमिक), नागपूर

प्रत माहितीसाठी :-

१. वित्त विभाग (व्यय-९)/(व्यय-५), मंत्रालय, मुंबई
२. कक्ष अधिकारी/अवर सचिव (एस एम ४)/अर्थसंकल्प, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
३. श्री. ईश्वर बकाराम साठवणे, ता. मौदा जि. नागपूर पीन-४४१ १०६
४. निवड नस्ती (टीएनटी-६) (प्र.क्र.८८/२०२२) (**E-१३६७५३३**)